# भारतीय समाजाकडून दलितांना न्याय?
# कधीच मिळणार नाही काय ?

मराठवाडा विद्यापिठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे नाव देण्यावरून मराठवाड्यात हिंसाचार सत्र सुरू झाले. हिंसाचाराचे लोण एका गावातून दुसऱ्या गावात पसरत गेले. एकेकाळी साधु-संतांनी वास केलेल्या मराठवाड्यात जणू अश्वमेधयज्ञ सुरू झाला. या यज्ञाचा जातीयतेचा घोडा जेथे जेथे जाईल तेथे तेथे यज्ञात दलितांच्या झोपड्या, भांडीकुंडी पिके, गुरे आणि काही ठिकाणी माणसेही आहुती समर्पित करण्यात आली. नामांतराचा निर्णय अजून घेतलेला नाही, त्याचा पुनर्विचार करण्यास हरकत नाही असे मुख्यमंत्री शरद पवार यांनी जाहीर केले तेव्हाच सैरावैरा धावणारा हा घोडा जागीच थांबला. या हिंसाचारात सुद्धा एक सूत्र आढळले. दलितांवर अत्याचार केले जात असता गावोगावी त्यांची पद्धतशीर नाकेबंदी करण्यात येत होती. सुलतानपूर येथे डॉ. आंबेडकर यांचा पुतळा फोडल्यानंतर ४८ तास तेथील दलीतांना गावाबाहेर पडणे अशक्य करून टाकण्यात आले होते. मराठवाड्यात प्रचंड हिंसाचार चालू असता रस्ते, रेल्वे, फोन, टपाल, तार, एस्. टी. या मार्गे मराठवाड्याचे जगाशी असलेले संपर्क तोडून टाकण्याचे सर्व उपाय अमलात आणण्यात आले होते. तेव्हा हा हिंसाचार केवळ भावनेचा उद्रेक समजणे अवघड आहे. अलिकडच्या काळात दलितांची जी प्रगती होत आहे ती न पाहवून मुळापासून दलित चळवळ नामोहरम करण्याच्या दृष्टीने या हिंसाचाराची पद्धतशीर योजना मांडली गेली असावी अशी शंका आल्याशिवाय रहात नाही.

मराठवाड्यातील घटनांना नामांतर कारण काय आहे असे म्हणणाऱ्यांना चांगलाच धडा मिळाला आहे. एखाद्या नावामागे किती प्रचंड ताकद असू शकते याचे दर्शन मराठवाड्याने घडवले. 'मराठवाडा' या शब्दामागे मराठवाड्याची प्रादेशिक ऐतिहासिक अस्मिता आहे असे म्हटले जाते. पण 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' हे नाव दिल्याने त्याला बाध येत नव्हती. आपण मराठवाडा हा शब्द कायम ठेवला होता. मग मराठवाडा शब्दामागे डॉ. आंबेडकरांचे नाव जोडल्याने ही मराठवाड्याची अस्मिता विरघळून जाणार होती असे म्हणण्याचे का ? या नामान्तराला झालेला विरोध नैमित्तिक आहे. वर्षानुवर्ष वर्णद्वेषाने तापलेल्या वातावरणातून निघालेल्या वाफेचा तो प्रचंड स्फोट आहे हे जरी खरे मानले तरी डॉ. आंबेडकरांच्या नावामागे दलितांची अस्मिता दडलेली आहे, त्यांच्या भावना गुंतलेल्या आहेत हे लक्षात घेऊनच हे निमित्त शोधले गेलेले आहे. शिक्षण उपलब्ध करून देऊन दलितांची अस्मिता डॉ. आंबेडकरांनी जागवली. माणसासारखे जगण्याचा हक्क दलितांनाही आहे याची जाण त्यांनी दलितांना दिली. या पुढाऱ्याचे नाव विद्यापिठाला देऊन दलितांच्या स्फूर्तिस्थानाची आठवण त्यांच्या मनात सतत जिवंत ठेवली तर आज अंकुरत असलेली दलित चळवळ फोफावत जाऊन आज ना उद्या त्याचा वट वृक्ष होईल ही भीती सनातन्यांच्या मनात दडलेली आहे. म्हणून आपल्या संख्येच्या जोरावर हाती असलेल्या सामाजिक आणि आर्थिक सत्तेच्या जोरावर लोकशाही मूल्ये पायदळी तुडवून फार मोठ्या प्रमाणात दलितांवर दडपशाही करण्यात आली. नामान्तराला विरोध करून त्या निमित्ताने डॉ. आंबेडकरांचे नाव आणि त्यांनी उभारलेली चळवळ दोन्ही निपटून टाकण्याचा अमानुष, तरीही केविलवाणा प्रयत्न करण्यात आला. पण झाडाची छाटणी करण्याने झाडाची वाढ अधिक जोमाने होते हे विसरून चालणार नाही. इंग्रजांनी दडपशाही केली म्हणून भारतीयांची स्वातंत्र्य चळवळ थोडीच दडपली गेली. आंबेडकरांचे नाव विद्यापिठाला दिले गेले अगर न दिले गेले तरी ते आता अजरामर होईल. कारण ज्या नावासाठी दलितांना एवढी मोठी किंमत मोजावी लागली ते नाव त्यांच्या अंतःकरणातून कधीच पुसले जाणार नाही. त्यांच्या अंतर्मनातून हे नाव त्यांना सदैव स्फुर्ती देत राहील. तेव्हा प्रश्न आहे तो एवढाच की सवर्ण समाज काळाची पावले केव्हा ओळखणार आहे ?

दलितविरोधी वातावरण मराठवाड्यात निर्माण होण्याची अनेक कारणे सांगण्यात येतात. मराठवाड्यात दलित विद्यार्थ्यांची संख्या खूप आहे. त्यात विदर्भातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची भर पडते. या विद्यार्थ्यांना शैक्षणिक, आर्थिक आणि नोकरीविषयक सवलती देण्यात येतात आण म्हणून आपण स्पर्धेत मागे पडतो याचा गरीब, दलितेतर विद्यार्थ्यांच्या मनात राग आहे. एक गाव एक पाणवठा चळवळीनेही आगीत भर टाकली. दलितांना गायराने कसायला दिली याचीही खंत सवर्णांच्या मनात आहेच. ह्यासारखी निरनिराळी कारणे पाहिली की भारतीयांच्या मनातील जातीयता किती खोलवर मूळ धरून बसली आहे ते लक्षात येते. दलितांना न्याय मिळवून देण्यात सनातन प्रवृत्ती किती खळखळ करते त्याचे हे द्योतक आहे. दलितांनी आता कोठे माणसासारखे जगायला मिळावे अशी मागणी करायला सुरवात केली आहे तर माणसाप्रमाणे जगण्याचा त्यांचा जन्मसिद्ध, नैसर्गिक हक्कही आम्ही मान्य करायला तयार नाही. कारण आम्हाला पोटापाण्यावारी गुरासारखे राबायला कोणीतरी हवे आहे. हिंदुधर्माप्रमाणे न्यायाच्या नावाखाली ज्यांच्यावर आम्ही शतकानुशतके अन्यायच केला त्यांना भूतकाळातील अन्यायाची भरपाई म्हणुन किंवा वर्तमान काळात सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी म्हणून झुकते माप देण्याचे मनाचे औदार्यही आम्ही दाखवू शकत नाही.

पंडित नेहरु, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक अण्णासाहेब कर्वे, महात्मा फुले यांची नावे विद्यापिठांना द्यावी किंवा त्यांची स्मारके बनवावी यासाठी कोणाला आंदोलन करावे लागले नाही. मग दलितांचे पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे थोर पुढारी होते तरीही त्यांच्या स्मारकासाठी दलितांना झगडा का द्यावा लागतो ? अजूनही समाजाचा एक भाग म्हणून दलितांना मान्यता द्यायला आम्ही तयार नाही ह्याचेच हे द्योतक नाही का ?

सरकारनेही दलितांच्या प्रश्नांची, भावनांची गंभीर दखल घेतलेली नाही. दलितांना दिलेल्या सवलतींचे राजकारण खेळून दलितांचा पाठिंबा मिळवणे एवढाच सरकारचा उद्देश होता. एकीकडे दलितांना वाटले की आपल्याला काहीतरी मिळाले. उलट सवर्णांना वाटले की आपल्या हातातून काहीतरी निसटले. पण प्रत्यक्षात मात्र काहीच घडले नाही. दलितांना दिलेल्या अनेक सवलती कागदावरच राहिल्या, दलितांना त्याचा विशेष फायदा मिळाला नाही. सवर्ण–दलितांमधील दरी कमी होण्याऐवजी जातीय तेढ आणखीच वाढली. दलितांना पिळवणुकीविरूद्ध संरक्षण देऊन, त्यांची सर्वांगिण उन्नती घडवून, सवर्णांमध्ये त्यांच्याबद्दल आपुलकी निर्माण करून खऱ्या अर्थाने सामाजिक समता, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न कधी झालाच नाही. वारा येईल तसे पाठ फिरवण्याचे धोरण दलितांबाबत सरकारने स्वीकारले. याचे प्रत्यंतर मराठवाड्यातील आंदोलनात पण आले. मराठवाडा विद्यापिठाला डॉ. आंबेडकरांचे नाव देण्यास सरकारने मान्यता दिली. परंतु मराठवाड्यात त्याविरोधी दंगल उसळचावर दलितांना संरक्षण देण्याबाबत मात्र सरकार बेफिकीर राहिले. नागपूरला आंबेडकर अनुयायांनी मोर्चा काढला तर थोड्या दंगलीचे निमित्त करून पोलिसांकडून गोळीबार करण्यात आला. पण इतके दिवस मराठवाड्यात दहशत, दंगली, जाळपोळ होऊनही दलितांना पोलिसांचे संरक्षण मिळाले नाही. पोलीसांनी बघ्याची भूमिका घेतली. कोणाला अटक केली नाही की दंगलखोरांपैकी कोणी गोळीबाराने जखमीही झाले नाही. जी दंगल सुरवातीलाच २४ तासात आटोक्यात आणता येणे शक्य होते ती दंगल अनेक दिवस चालू राहिली आणि त्यात दलितांची ससेहोलपट झाली.

या सगळ्या गोष्टीचा निष्कर्ष असा निघतो की अजूनही आमच्या समाजाची दलितांना न्याय्य वागणूक देण्याची तयारी नाही. माणूस म्हणून, स्वतंत्र लोकशाही राज्याचे नागरी म्हणून जे हक्क त्यांना मिळणे आवश्यक आहे त्या हक्काची सर्रास पायमल्ली चालू आहे. राज्यघटनेत नमुद करूनही विषमतेवर आधारलेली समाजरचना बदलून समतेवर आधारलेली समाजरचना निर्माण करण्याचा आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्नच करत नाही. आमचा पेहेराव पुरोगामी बनत चालला पण आमचं मन सनातनीच आहे.

विषमतेवर आधारलेल्या समाजव्यवस्थेमध्ये दलितांचे जे मोठ्याप्रमाणात शोषण चालू आहे ते पाहिले असता मनाला प्रश्न पडतो की विषमतेच्या भांगेने गुंग झालेला आपला समाज आपणहून कधी जागा होणार की नाही ? की बळकट संघटना बांधून आणि संघटितपणे लढूनच हे मानवी हक्क मिळवावे लागणार !

- सौदामिनी राव